महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५५३ ५२३६
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापु/विवि/२०२१/ १३४८ दिनांक 10 MAR 2021

प्रति,
संचालक/प्राचार्य,
पुणे विभागातील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित
विना-अनुदानित संस्था, पुणे

विषय :- भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे "आजादी का अमृत महोत्सव" हा उपक्रम साजरा करण्यासंदर्भात.
संदर्भ :- संचालनालयातील कार्यासन क्रमांक १६ येथील प्राप्त संदेश.

उपरोक्त विषयाबाबत प्राप्त संदेशानुसार भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे "आजादी का अमृत महोत्सव" हा उपक्रम दिनांक १२-०३-२०२१ ते ०५-०४-२०२१ या कालावधीत साजरा करावयाचा आहे. त्यानुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, खाली नमूद केलेनुसार विविध कार्यक्रमांचे संस्थास्तरावर आयोजन करण्यात यावे व त्याबाबतचा कार्यपूर्ती अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. सदर कार्यपूर्ती अहवाल संचालनालयास व शासनास सादर करावयाचा आहे.

| अ.क्र. | दिनांक | प्रस्तावित कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | १२-०३-२०२१ | आजादीका अमृतमहोत्सव या उपक्रमाचे संस्थास्तरावर उद्‌घाटन |
| २ | १५-०३-२०२१ ते २०-०३-२०२१ | १)भारताच्या स्वातंत्र्य लढ्याबाबत व्याख्यान शैक्षणिक संस्थामध्ये आयोजित करणे<br>२)विद्यार्थ्यांद्वारे मूलभूत कर्तव्याची जाणीव करुन देणारे जनजागृती निर्माण करणारे संदेशपर कार्यक्रम आयोजित करणे.<br>३) विभागीय स्तरावर निबंध स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने आयोजित करणे. |
| ३ | २२-०३-२०२१ ते २७-०३-२०२१ | १) स्वातंत्र्य सेनानी / तज्ञ व्याख्यात्यांचे व्याख्यान<br>२) विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन वेबिनार आयोजन करणे<br>३) वेळोवेळी झालेल्या घटनादुरुस्तीवर चर्चासत्र आयोजित करणे. |
| ४ | ३०-०३-२०२१ ते ३१-०३-२०२१ | शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ऑनलाईन/ऑफलाईन व्याख्यानाचे आयोजन. |
| ५ | ०१-०४-२०२१ ते ०५-०४-२०२१ | संबधित जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाणांची माहिती विद्यार्थ्यांना देणे. |

(डॉ. द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

d:\all folder\certificate\dte.docx